दृष्टिक्षेप

# मागासवर्गीय शासकीय निवासी शाळांमध्ये प्रवेशाची प्रक्रिया सुरू

लोकशाही वार्ता / नागपूर

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी चालविण्यात येणाऱ्या शासकीय निवासी शाळा सुरू करण्यात आलेली आहेत. सामाजिक न्याय विभागांतर्गत नागपूर जिल्ह्यात अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा, वारंगाव ता. कामठी, जि. नागपूर येथे एक व अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलींची शासकीय निवासीशाळा, वानाडोंगरी, जि. नागपूर येथे एक अशा दोन शासकीय निवासी शाळा इयत्ता ६ वी ते १० वीपर्यंत कार्यरत असून सन २०२४-२५ या शैक्षणिक सत्रात सदर निवासीशाळेत मोफत प्रवेश देणे सुरू आहे.

सामाजिक न्याय विभागांतर्गत कार्यान्वित जिल्ह्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलां/मुलींच्या शासकीय निवासीशाळेत अभ्यासक्रमासाठी प्रशिक्षित व अनुभवी शिक्षक वर्ग, मोफत शिक्षण साहित्य, शालेय गणवेश, क्रीडा ट्रॅक सूट, सर्व शैक्षणिक साहित्य पाठ्यपुस्तके, शैक्षणिक साहित्य, पौष्टिक जेवण, नाश्ता, दूध, अंडी, फळे, अंथरुण, पांघरुण, आंघोळीकरिता गरम पाण्याची व्यवस्था, सी.सी.टी.व्ही. सुरक्षा, डिजिटल क्लास रूम, ग्रंथालय, प्रयोग साहित्याची सुसज्ज प्रयोगशाळा, खेळासाठी भव्य क्रीडांगणासहीत क्रीडा साहित्य व ग्रीन जिम, सुसज्ज संगणक कक्ष, सुसज्ज सायन्स लॅब, सुसज्ज मॅथ लॅब, भाषा लॅब, विविध वाद्य साहित्याने समृद्ध संगीत कक्ष, ई-लायब्ररी व इंटरनेट वाय-फाय आदी सुविधा विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येतात.

सन २०२४-२५ या सत्रात इयत्ता ६ वी ते १० वीमध्ये रिक्त जागेकरिता ज्या इच्छुक विद्यार्थी, विद्यार्थिनींना सामाजिक न्याय विभागांतर्गत अनुसूचित जातीच्या शासकीय निवासीशाळेत प्रवेश घ्यावयाचा आहे अशा गरजू विद्यार्थ्यांनी (मुलींकरिता) अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलींची शासकीय निवासी शाळा, वानाडोंगरी येथून व (मुलांकरिता) अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा, वारंगाव येथून विनामूल्य अर्ज प्राप्त करून निर्धारित मुदतीत संपूर्ण आवश्यक कागदपत्रासह संबंधित निवासी शाळेचे मुख्याध्यापक यांच्याकडे सादर करावेत, असे जाहीर आवाहन सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी संबंधित शासकीय निवासी शाळेचे मुख्याध्यापक किंवा सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण नागपूर या कार्यालयाशी संपर्क करावा.